# प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (PSE) इयत्ता 4 थी, एप्रिल – 2026

**बैठक क्र.** | | | | | | | | | | | |

**0101**

**पेपर क्र. - I**

**वेळ : 11:00 ते 12:30**

## माध्यम : मराठी

**संच A**

**एकूण गुण : 150**

## प्रथम भाषा व गणित

**पृष्ठ : 32**

**प्रश्नपत्रिका सोडविण्यापूर्वी कृपया खालील सूचना काळजीपूर्वक वाचा :**

(1) या प्रश्नपत्रिकेत **दोन** विभाग आहेत. त्यापैकी विभाग **I** मध्ये प्रथम भाषा विषयासाठी **1** ते **25** व विभाग **II** मध्ये गणित विषयासाठी **26** ते **75** असे एकूण **75** प्रश्न आहेत. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(2) प्रत्येक प्रश्नासाठी **2** गुण आहेत.

(3) प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी एकूण **90** मिनिटांचा कालावधी दिला जाईल.

(4) उत्तरे नोंदविण्यासाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका दिलेली आहे. प्रत्येक प्रश्नक्रमांकासमोर चार पर्यायासाठी क्रमागत वर्तुळे दिलेली आहेत. त्यातील अचूक उत्तराचा पर्याय क्रमांक असलेले वर्तूळ पुढील उदाहरणात दाखविल्याप्रमाणे रंगवा. उदा. प्रश्न क्र. **6** च्या बरोबर उत्तराचा पर्याय क्र. **2** असेल, तर तो पुढीलप्रमाणे नोंदवावा.
प्रश्न क्र. **6**    ① ● ③ ④

(5) खालीलप्रमाणे नोंदविलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. असे उत्तर नोंदविल्यास त्या प्रश्नास 'शून्य' गुण दिले जातील.    ✓ ② ⊙ ④

(6) प्रत्येक प्रश्नासाठी एकापेक्षा अधिक वर्तुळात नोंदविलेली उत्तरे, खाडाखोड करून नोंदविलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

(7) एकदा नोंदविलेली उत्तरे पुन्हा बदलता येणार नाहीत.

(8) पर्यायाची उत्तरे नोंदविताना फक्त काळ्या किंवा निळ्या रंगाच्या बॉलपेनचाच वापर करावा. पेन्सिलने नोंदविलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

(9) प्रश्नपत्रिकेत प्रत्येक पानावर खाली व शेवटच्या पानावर कच्चे काम करण्यासाठी मोकळी जागा आहे, तेथेच कच्चे काम करावे.

(10) परीक्षेस मर्यादित वेळ असल्याने एखाद्या प्रश्नाचे उत्तर तुम्हाला येत नसल्यास पुढील प्रश्न सोडवा. शेवटी वेळ शिल्लक राहिल्यास उरलेल्या प्रश्नांसाठी पुन्हा प्रयत्न करावा.

(11) एखाद्या प्रश्नात त्रुटी/चूक आढळल्यास त्याबाबत पर्यवेक्षक किंवा परीक्षा केंद्रसंचालक यांच्याकडे विचारणा करू नये.

(12) प्रश्नातील त्रुटी/चूक/आक्षेपाबाबतचे निवेदन शाळेने किंवा पालकांनी गटशिक्षणाधिकारी किंवा शिक्षणाधिकारी यांच्याकडे लेखी स्वरूपात न पाठवता संबंधित शाळेच्या लॉगीन मधून ऑनलाईन पद्धतीनेच पाठवावे.

(13) त्रुटी/चूक/आक्षेपाबाबतचे निवेदन ऑनलाईन पद्धतीने पाठविण्याची मुदत परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर अंतरिम (तात्पुरती) उत्तरसूची प्रसिद्ध झाल्यापासून 10 (दहा) दिवसांपर्यंत राहील.

(14) मुद्रणदोष किंवा अन्य कारणांमुळे प्रश्न चुकीचा असल्याचे आढळल्यास तज्ञ समितीच्या अभिप्रायानुसार योग्य ती कार्यवाही केली जाईल.

(15) मूळ माध्यमासोबत इंग्रजी भाषेतील प्रश्नपत्रिका दिलेली आहे. मूळ माध्यमातील संदिग्ध प्रश्नांबाबत इंग्रजी प्रश्न पहावेत.

## विभाग - I

### मराठी

**01.** खालील वाक्यातील उद्देश्य भाग ओळखा.
'स्वच्छ केलेल्या फरशीचे मोठे चौकोन जणू त्यांचीच वाट पाहत थांबले होते.'
(1) स्वच्छ केलेल्या फरशीचे मोठे चौकोन
(2) थांबले होते.
(3) वाट पाहत थांबले होते.
(4) त्याचीच

**02.** खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाचा योग्य अर्थ ओळखा.
'<u>माळा</u> आवरताना आईला खूप साऱ्या माळा सापडल्या.
(1) घराचा वरचा भाग
(2) गळयातील दागिना
(3) रान
(4) शेतजमीन

**03.** पुढीलपैकी प्रत्ययघटित नसलेला शब्द कोणता?
(1) चित्रकार (2) परोपकार
(3) नकलाकार (4) कलाकार

**04.** खालील शब्द शब्दकोशातील क्रमानुसार लावल्यास उजवीकडून तिसरा शब्द कोणता येईल?
उन्नती, इकडे, ऋण, ओढ, आकाश, एरंड
(1) एरंड (2) इकडे
(3) उन्नती (4) ऋण

**05.** पुढीलपैकी 'व्यक्ती आणि किताब' यांची चुकीची जोडी कोणती?
(1) सेनानायक बापट (2) महात्मा फुले
(3) स्वातंत्र्यवीर सावरकर (4) आचार्य अत्रे

**<u>कच्च्या कामासाठी फक्त</u>**

**06.** खालील वाक्यातील क्रियापद ओळखा.

'पकडापकडी खेळता-खेळता सगळ्या बिया जातील वाया.'

(1) पकडा (2) वाया

(3) जातील (4) खेळता

**07.** पुढीलपैकी जोडशब्द नसलेला पर्याय कोणता?

(1) साजसरंजाम (2) सांजवात

(3) साजशृंगार (4) सांजसकाळ

**08.** पुढीलपैकी विरूद्ध अर्थाच्या शब्दांची योग्य जोडीचा पर्याय निवडा.

(1) कारूण्य × ममत्व (2) नियंत्रण × संयम

(3) विलंब × घाई (4) भान × लक्ष

**09.** खालील वाक्यातील नामांची संख्या किती?

'शेतात होती सूर्यफुले - पिवळीधमक, टपोरी आणि टवटवीत.'

(1) दोन (2) तीन

(3) एक (4) पाच

**10.** एकवचन - अनेकवचन यांची अयोग्य जोडी पर्यायांतून निवडा.

(1) चूल - चुली (2) भेट - भेटी

(3) चूक - चुकी (4) वेल - वेली

**11.** 'ज, प, व, क, मा, न' या अक्षरांपासून तयार होणाऱ्या अर्थपूर्ण शब्दातील कोणत्या क्रमांकांची अक्षरे घेतल्यास 'भार' या अर्थाचा शब्द तयार होईल?

(1) ३ ऱ्या, १ ल्या, ६ व्या

(2) १ ल्या, २ ऱ्या, ३ ऱ्या

(3) ४ थ्या, ५ व्या

(4) ४ थ्या, ५ व्या, ६ व्या

**कच्च्या कामासाठी फक्त**

**12.** 'अल्पबुद्धी असलेली व्यक्ती अति बढाया मारते.' या अर्थाची म्हण असलेला पर्याय निवडा.

(1) उधारीचे पोते सव्वा हात रिते.
(2) वासरांत लंगडी गाय शहाणी.
(3) उथळ पाण्याला खळखळाट फार.
(4) 'ओ' म्हणता 'ठो' येईना.

**13.** खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांसाठी योग्य शब्द पर्यायांतून निवडा.
कधी <u>गावातून, कधी शेतातून जाणाऱ्या लहान वाटेवरून</u> माझी सर्व जनावरे बिनचुकता गोठ्याकडे परत येतात.

(1) पायवाट
(2) पाट
(3) बांध
(4) पाणंद

**14.** खालील वाक्याचा अर्थ पूर्ण करणाऱ्या योग्य वाक्प्रचाराचा पर्याय निवडा.
'अपघातग्रस्त वाहनातील सर्व लोक सुखरूप असल्याचे समजताच सर्वांचा __________.'

(1) चेहरा कसानुसा होणे.
(2) जीव भांडयात पडणे.
(3) हिरमोड होणे.
(4) थरकाप होणे.

**प्रश्न क्र. 15 ते 17 साठी सूचना :** खालील उतारा काळजीपूर्वक वाचून त्यावर आधारित प्रश्नांची अचूक उत्तरे पर्यायांतून निवडा.

एकदा रानात गुरे चारताना मुरलीला एक सुंदर निळा पक्षी जखमी होऊन पडलेला दिसला. त्याने त्या पक्ष्याला मायेने अलगत उचलून घरी नेले आणि एका टोपलीत मऊ गोधडीवर ठेवले. मुरलीच्या आईने त्या पाखराच्या जखमेवर हळद लावली. त्याची चोच उघडून थोडे पाणी चोचीत टाकले. गव्हा-तांदळाचे थोडे दाणे खाण्यासाठी टोपलीत ठेवले. खाऊन-पिऊन तो पक्षी दुसऱ्या दिवशी थोडा तरतरीत झाला. हे पाहून आईने कौतुकाने त्या पक्ष्याला भिजवलेली डाळ खायला दिली. त्याला ती फारच आवडली. तो आनंदाने घरभर हिंडू-फिरू लागला.

**15.** उताऱ्यानुसार पुढीलपैकी कोणते विधान अयोग्य आहे?

(1) आईने पक्ष्याला पाणी पाजले.
(2) मुरली हा एक गुराखी होता.
(3) भिजवलेली डाळ खाल्ल्याने पक्षी थोडा तरतरीत झाला.
(4) आईने पक्ष्याच्या जखमेवर हळद लावली.

**<u>कच्च्या कामासाठी फक्त</u>**

16. पुढीलपैकी कोणते विशेषण पक्ष्यासाठी आलेले नाही?

(1) चिमुकला (2) तरतरीत

(3) सुंदर (4) निळा

17. पुढीलपैकी कोणत्या शब्दाचा समान अर्थाचा शब्द उताऱ्यात आला आहे?

(1) घरटे (2) नभ

(3) वृक्ष (4) हळू

**प्रश्न क्र. 18 ते 20 साठी सूचना :** पुढील कविता वाचून त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पर्यायांतून निवडा.

झुकझुक जाई कोकणची राणी
    डौलानं धावते घाटवळणांनी।।
माडा-पोफळीच्या रांगा
    राई आंब्यांची ही दाट।।
काजू फणसाची झाडे
    हिरव्या रंगाचा हा थाट।।
करवंद जांभळांची
    चव आहे न्यारी।।
रातांब्याच्या चवीची
    वेगळीच खुमारी।।
हिरवीगार शिवारे
    नि सागराची निळाई।।
कोकणचा मेवा खायची
    भलतीच घाई।।

18. कोकणची राणी कोणाला म्हटले आहे?

(1) गाडी (2) बाग

(3) मुलगी (4) रेल्वे

**कच्च्या कामासाठी फक्त**

19. पुढीलपैकी 'विशेषण विशेष्य' यांची अयोग्य जोडी असलेला पर्याय निवडा.
(1) डौलानं घाटवळणे
(2) न्यारी चव
(3) दाट राई
(4) हिरवीगार शिवारे

20. 'डोंगरची काळी मैना' अशी ओळख असणाऱ्या कोणत्या फळाचा उल्लेख कवितेत आला आहे?
(1) रातांबा
(2) जांभूळ
(3) करवंद
(4) फणस

21. खालील आकृतीत रिकाम्या जागी कोणत्या पर्यायातील सर्व अक्षरे अनुक्रमे घेतल्यास सर्व उभे अर्थपूर्ण शब्द तयार होतील?

| | | | |
|---|---|---|---|
| द | र | प | ज |
| न | ड | ट | र |

(1) चं, प, आ, व
(2) रू, ओ, वि, अं
(3) व, द, न, ज
(4) व, द, धो, न

22. पुढील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य समूहदर्शक शब्द निवडा.
'बेटावर अडकलेल्या लोकांना घेऊन जहाजांचा __________ किनाऱ्याकडे निघाला.'
(1) काफिला
(2) थवा
(3) तांडा
(4) कळप

23. पुढील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य आलंकारिक शब्द निवडा.
'काशिनाथच्या जुनाट दुखण्यावर वैद्यबुवांनी __________ औषध शोधले.'
(1) उपयोगी
(2) रामबाण
(3) महाग
(4) जुने

**कच्च्या कामासाठी फक्त**

**24.** दिलेल्या वाक्यातील काळ ओळखून त्याच काळातील वाक्य पर्यायांतून निवडा.
'सशांना पाहून गुंजा आपले गाल फुगवतील.'

(1) कोवळ्या उन्हात दवबिंदू चमकतात.
(2) मला खूप समाधान वाटले.
(3) आपण संध्याकाळी बाहेर जाऊ.
(4) थोड्याच वेळात सगळे नदीकाठी जमले.

**25.** खालील वाक्यांत एकूण किती विरामचिन्हे आली आहेत?
काकू ओरडल्या, ''ए, थांबा सगळे. पान, वाटी, तांब्या, भांडी हे सगळं कोण उचलणार?''


(1) चार (2) पाच
(3) सात (4) आठ


**कच्च्या कामासाठी फक्त**


## SECTION - II

## MATHEMATICS

**26.** Complete the picture pattern given below.



(1) 

(2) 

(3) 

(4) 

**27.** If Independence Day is on Friday then which days will occur 5 times, in the same month?

(1) Saturday, Sunday, Monday
(2) Monday, Tuesday, Wednesday
(3) Tuesday, Wednesday, Thursday
(4) Friday, Saturday, Sunday

**28.** Which will be the second last number, if the following numbers are written in descending order?
40405, 45005, 45050, 40504

(1) 40504
(2) 45005
(3) 40405
(4) 45050

**29.** Salma needs two and half meter of fabric to stitch a Kurti and her two sisters need one and half meter of fabric each. The shopkeeper cut the required fabric for the three of them from a fabric roll of 10 meters and gave them. How much of the fabric is remaining in the roll?


(1) 5.5 meters
(2) 4.5 meters
(3) 7.5 meters
(4) 7 meters


**SPACE FOR ROUGH WORK**


**विभाग - II**


**गणित**

**26.** खालील आकृतिबंध पूर्ण करा.



(1) 

(2) 

(3) 

(4) 

**27.** स्वातंत्र्यदिनाला शुक्रवार असल्यास त्या महिन्यात कोणते वार पाच वेळा येतील?

(1) शनिवार, रविवार, सोमवार
(2) सोमवार, मंगळवार, बुधवार
(3) मंगळवार, बुधवार, गुरूवार
(4) शुक्रवार, शनिवार, रविवार

**28.** खालील संख्या उतरत्या क्रमाने लिहिल्या असता शेवटून दुसरी संख्या कोणती येईल?
४०४०५, ४५००५, ४५०५०, ४०५०४

(1) ४०५०४
(2) ४५००५
(3) ४०४०५
(4) ४५०५०

**29.** कुर्ती शिवण्यासाठी सलमाला अडीच मीटर व तिच्या दोन बहिणींना प्रत्येकी दीड मीटर कापड लागते. १० मीटरच्या ताग्यातून दुकानदाराने तिघींसाठी कापड कापून दिले असता ताग्यात किती कापड शिल्लक राहिल?

(1) साडे पाच मीटर
(2) साडे चार मीटर
(3) साडे सात मीटर
(4) सात मीटर

**कच्च्या कामासाठी फक्त**

**30.** If the fractions $\frac{5}{3}, \frac{8}{3}, \frac{7}{3}, \frac{1}{3}, \frac{4}{3}$ are arranged in descending order, then which of the following fractions will occur serially first and last?

(1) $\frac{1}{3}$ and $\frac{8}{3}$
(2) $\frac{8}{3}$ and $\frac{7}{3}$
(3) $\frac{1}{3}$ and $\frac{4}{3}$
(4) $\frac{8}{3}$ and $\frac{1}{3}$

**31.** Between 1 to 100, which digit out of 1 and 2 occurs more number of times and by how much?


(1) digit 1 occurs 2 more times than 2
(2) digit 1 occurs 1 more time than 1.
(3) digit 1 and 2 occur equal number of times.
(4) digit 2 occurs 1 more time than 1.

**32.** Select from the options which numbers will replace ∗ and □ respectively in the given example.

$$\begin{array}{r} \ast\ 0\ \ast\ 0\ \square \\ -\quad 1\ 6\ 2\ \ast \\ \hline \square\ 9\ 1\ \square\ 9 \end{array}$$

(1) 7, 8
(2) 6, 7
(3) 8, 7
(4) 7, 6

**33.** Write the number of vertices in the given figure.



(1) 8
(2) 10
(3) 12
(4) 14

**SPACE FOR ROUGH WORK**

**30.** $\frac{५}{३}, \frac{८}{३}, \frac{७}{३}, \frac{१}{३}, \frac{४}{३}$ हे अपूर्णांक उतरत्या क्रमाने लावल्यास पहिला व शेवटचा अपूर्णांक अनुक्रमे कोणता येईल?

(1) $\frac{१}{३}$ व $\frac{८}{३}$

(2) $\frac{८}{३}$ व $\frac{७}{३}$

(3) $\frac{१}{३}$ व $\frac{४}{३}$

(4) $\frac{८}{३}$ व $\frac{१}{३}$

**31.** १ ते १०० संख्यांमध्ये १ व २ यापैकी कोणता अंक जास्त वेळा आला आहे व कितीने?

(1) १ हा अंक २ ने जास्त वेळा आला आहे.

(2) १ हा अंक १ ने जास्त वेळा आला आहे.

(3) १ व २ अंक समान वेळा आले आहेत.

(4) २ हा अंक १ ने जास्त वेळा आला आहे.

**32.** खालील उदाहरणामध्ये ∗ आणि □ च्या जागी अनुक्रमे कोणते अंक येतील हे पर्यायातून निवडा.

```
  ∗ 0 ∗ 0 □
−   १ ६ २ ∗
-----------
  □ ९ १ □ ९
```


(1) ७, ८

(2) ६, ७

(3) ८, ७

(4) ७, ६

**33.** खालील आकृतीचे शिरोबिंदू मोजून लिहा.



(1) ८

(2) १०

(3) १२

(4) १४

**कच्च्या कामासाठी फक्त**

**34.** Students are arranged for a music drill. The number of rows is greatest 1 digit odd number. The number of students in each row is smallest 2 digit odd number. How many students are standing for the drill?

(1) 99 (2) 171

(3) 180 (4) 33

**35.** How many symmetrical lines can be drawn in a circle?

(1) one and only 1 (2) 2

(3) infinite (4) not any

**36.** Joseph filled 12 boxes with 18 mangoes in each box. 5 mangoes remained with him. How many mangoes did Joseph have?

(1) 212 (2) 221

(3) 216 (4) 211

**37.** Sumedh distributed pens equal to the number of friends, to every friend. Then, how many pens did he distribute in all?

(1) 27 (2) 38

(3) 53 (4) 49

**38.** Using the digits 9, 5, 0, 4, 1 only once, the smallest 5 digit number written by Ameya was 10459. Safa wrote 01459, Tanvi wrote 95410, Arya wrote 95401. Who wrote the correct number?

(1) Safa (2) Tanvi

(3) Ameya (4) Arya

**39.** For a school picnic, 37 students paid Rs. 455 each. Rs. 12,000 were deposited at State Transport Board. What is the balance amount for other expenses?

(1) 16835 (2) 4835

(3) 28835 (4) 4735

**SPACE FOR ROUGH WORK**

**34.** पटांगणात संगीत कवायतीसाठी विद्यार्थी उभे केले आहेत. एक अंकी सर्वात मोठ्या विषम संख्येइतक्या ओळी आहेत व प्रत्येक ओळीत दोन अंकी सर्वात लहान विषम संख्येइतके विद्यार्थी आहेत. तर एकूण किती विद्यार्थी कवायतीसाठी उभे केले आहेत?

(1) ९९ (2) १७१

(3) १८० (4) ३३

**35.** वर्तुळाला किती सममिती अक्ष काढता येतात?

(1) एक आणि एकच (2) दोन

(3) असंख्य (4) एकही नाही

**36.** जोसेफने एका पेटीत १८ आंबे याप्रमाणे १२ पेट्या भरल्या असता ५ आंबे शिल्लक राहतात. तर जोसेफकडे किती आंबे होते?

(1) २१२ (2) २२१

(3) २१६ (4) २११

**37.** सुमेधने जेवढे मित्र आहेत तेवढेच पेन प्रत्येक मित्राला वाटले असतील तर त्याने पुढीलपैकी एकूण किती पेन वाटले असतील?

(1) २७ (2) ३८

(3) ५३ (4) ४९

**38.** ९, ५, ०, ४, १ हया अंकांची पुनरावृत्ती न करता पाच अंकी लहानात लहान संख्या अमेयने १०४५९, सफाने ०१४५९, तन्वीने ९५४१० व आर्याने ९५४०१ अशा लिहिल्या आहेत. तर अचूक संख्या कोणी लिहिली?

(1) सफा (2) तन्वी

(3) अमेय (4) आर्या

**39.** शालेय सहलीसाठी ३७ विद्यार्थ्यांनी प्रत्येकी ४५५ रूपये जमा केले. त्यातील १२००० रूपये एस.टी. महामंडळात भरले. तर इतर खर्चाला किती रूपये शिल्लक राहिले?

(1) १६८३५ (2) ४८३५

(3) २८८३५ (4) ४७३५

**कच्च्या कामासाठी फक्त**

**40.** Identify the 3 numbers occuring in the following pattern.

100, 99, 97, 94, 90, ____, ____, ____

(1) 86, 81, 75 (2) 84, 79, 73

(3) 85, 79, 72 (4) 85, 80, 76

**41.** Which of the following fractions is greater than $\frac{4}{7}$?

(1) $\frac{3}{7}$ (2) $\frac{2}{7}$

(3) $\frac{1}{7}$ (4) $\frac{4}{3}$

**42.** In July, 14456 students visited the Science Center. In August, 19656 students visited the Science Centre. How many students, in all, visited the Science Centre in two months?

(1) 24002 (2) 34012

(3) 34112 (4) 5200

**43.** Sheetal wrote 5 ten thousand + 1 unit + 9 tens + 4 hundreds as 5491. What is the difference between the number and her written number?

(1) 55982 (2) 45000

(3) 0 (4) 4500

**44.** Select a number from the options to replace ☐.

```
    6☐
8)53☐
 - 48
   05☐
  -5 6
   0 1
```

(1) 8 (2) 7 (3) 5 (4) 6

**SPACE FOR ROUGH WORK**

**40.** खालील आकृतिबंधात पुढे येणाऱ्या तीन संख्या ओळखा.

१००, ९९, ९७, ९४, ९०, ....., ......, ......

(1) ८६, ८१, ७५ (2) ८४, ७९, ७३

(3) ८५, ७९, ७२ (4) ८५, ८०, ७६

**41.** $\frac{४}{७}$ या अपूर्णांकापेक्षा खालीलपैकी कोणता अपूर्णांक मोठा आहे?

(1) $\frac{३}{७}$ (2) $\frac{२}{७}$

(3) $\frac{१}{७}$ (4) $\frac{४}{३}$

**42.** एका विज्ञान केंद्राला जुलै महिन्यात १४४५६ व ऑगस्ट महिन्यात १९६५६ विद्यार्थ्यांनी भेट दिली. तर दोन्ही महिन्यात मिळून एकूण किती विद्यार्थ्यांनी भेट दिली?

(1) २४००२ (2) ३४०१२

(3) ३४११२ (4) ५२००

**43.** शीतलने ५ दशहजार + १ एकक + ९ दशक + ४ शतक ही संख्या ५४९१ अशी लिहिली तर तिने लिहिलेली संख्या व मूळ संख्या यातील फरक किती?

(1) ५५९८२ (2) ४५०००

(3) ० (4) ४५००

**44.** खालील उदाहरणात □ च्या जागी कोणता अंक येईल हे पर्यायातून निवडा.

```
   ६□
८)५३□
 −४८
  ०५□
  −५६
   ०१
```

(1) ८ (2) ७ (3) ५ (4) ६

**कच्च्या कामासाठी फक्त**

**45.** A Company manufactures 14 three wheelers and some four wheeler vehicles in a day. The total number of wheels of all vehicles is 146. How many four wheelers vehicles were there?

(1) 42 (2) 104

(3) 108 (4) 26

**46.** Shrikant earned Rs. 33600 by selling 16 sacks of marigold flowers. If he has sold 1 kg of flowers for Rs. 60, how many kilograms of flowers did he sell?

(1) 35 (2) 45

(3) 560 (4) 550

**Instructions For Questions No. 47 to 49 :**

The given pictograph represents the snacks eaten by girl students in a college canteen on Sunday morning. Answer the questions using this information.

| Name of food items | Number of girl students |
|---|---|
| Idli-chutney | ☺ ☺ ☺ ☺ ☺ ☺ ☺ |
| Kande pohe | ☺ ☺ ☺ ☺ |
| Upma | ☺ ☺ |
| Masala dosa | ☺ ☺ ☺ ☺ ☺ |

Scale ☺ = 7 girl students.

**47.** What is the total number of girl students eating kande pohe and masala dosa?

(1) 28 (2) 63

(3) 35 (4) 77

**SPACE FOR ROUGH WORK**

**45.** एका कंपनीने एका दिवसात तीन चाकी १४ व चार चाकी काही वाहने बनवली. सर्व वाहनांच्या चाकांची एकूण संख्या १४६ असल्यास चार चाकी वाहनांची संख्या किती असेल?

(1) ४२ (2) १०४
(3) १०८ (4) २६

**46.** श्रीकांतने १६ पोती झेंडूची फुले विकून ३३६०० रूपये मिळविले. जर त्याने एक किलो फुले ६० रू. दराने विकली असल्यास एकूण किती किलो फुले विकली?

(1) ३५ (2) ४५
(3) ५६० (4) ५५०

**प्रश्न क्रमांक 47 ते 49 साठी सूचना :**

कॉलेजच्या उपाहारगृहात रविवारी सकाळी विद्यार्थिनींनी खाल्लेले पदार्थ चित्ररूप माहितीच्या रूपात दिले आहेत. दिलेल्या माहितीच्या आधारे प्रश्नांची उत्तरे द्या.

| पदार्थांची नावे | विद्यार्थिनींची संख्या |
|---|---|
| इडली चटणी | ☺ ☺ ☺ ☺ ☺ ☺ ☺ |
| कांदेपोहे | ☺ ☺ ☺ ☺ |
| उपमा | ☺ ☺ |
| मसाला डोसा | ☺ ☺ ☺ ☺ ☺ |

प्रमाण ☺ = ७ विद्यार्थिनी

**47.** कांदेपोहे व मसाला डोसा खाणाऱ्या विद्यार्थिनींची एकूण संख्या किती?

(1) २८ (2) ६३
(3) ३५ (4) ७७

**कच्च्या कामासाठी फक्त**

**48.** How much less or more is the number of girl students eating kande pohe and upma than the girls eating idli chutney and masala dosa?

(1) less by 42 (2) more by 42
(3) less by 84 (4) more by 84

**49.** Which food item is consumed very less?

(1) Idli chutney (2) Kande pohe
(3) Upma (4) Masala dosa

**50.** Identify the fractions with common denominator.


$\frac{4}{5}, \frac{3}{4}, \frac{5}{6}, \frac{6}{5}, \frac{4}{3}, \frac{1}{2}, \frac{1}{7}$

(1) $\frac{1}{2}, \frac{1}{7}$ (2) $\frac{4}{5}, \frac{4}{3}$
(3) $\frac{5}{6}, \frac{6}{5}$ (4) $\frac{4}{5}, \frac{6}{5}$

**51.** The area of a rectangle and a square is same and is 64 sq.cm. If the length of a rectangle is 16 cm, what will be its breadth?

(1) 16 cm. (2) 4 cm.
(3) 8 cm. (4) 32 cm.

**52.** Find the perimeter of the given figure.




(1) 30 (2) 25
(3) 27 (4) 17

**53.** Suraj divided 96 by 16 instead of 6. Then, by how much is his division wrong?

(1) 16 (2) 10
(3) 6 (4) 22

**SPACE FOR ROUGH WORK**

**48.** कांदेपोहे व उपमा खाणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या इडली चटणी व मसाला डोसा खाणाऱ्या विद्यार्थिनींच्या संख्येपेक्षा कितीने कमी अथवा जास्त आहे?

(1) ४२ ने कमी आहे. (2) ४२ ने जास्त आहे.

(3) ८४ ने कमी आहे. (4) ८४ ने जास्त आहे.

**49.** उपहारगृहात विद्यार्थिनींनी कोणता पदार्थ सर्वात कमी खाल्ला आहे?

(1) इडली चटणी (2) कांदेपोहे

(3) उपमा (4) मसाला डोसा

**50.** खालील अपूर्णांकांपैकी समच्छेद अपूर्णांक ओळखा.

$\frac{४}{५}, \frac{३}{४}, \frac{५}{६}, \frac{६}{५}, \frac{४}{३}, \frac{१}{२}, \frac{१}{७}$

(1) $\frac{१}{२}, \frac{१}{७}$ (2) $\frac{४}{५}, \frac{४}{३}$


(3) $\frac{५}{६}, \frac{६}{५}$ (4) $\frac{४}{५}, \frac{६}{५}$

**51.** आयताचे व चौरसाचे क्षेत्रफळ समान असून ते ६४ चौसेमी आहे. जर आयताची लांबी १६ सेमी असेल तर आयताची रूंदी काढा.

(1) १६ सेमी. (2) ४ सेमी.

(3) ८ सेमी. (4) ३२ सेमी.

**52.** खालील आकृतीची परिमिती काढा.




(1) ३० (2) २५

(3) २७ (4) १७

**53.** सूरजने ९६ ला ६ ने भागण्याऐवजी १६ ने भागले तर त्याचा भागाकार कितीने चुकला?

(1) १६ (2) १०

(3) ६ (4) २२

**कच्च्या कामासाठी फक्त**

**54.** There are 5719 elephants in Assam. Meghalaya has 3965 more elephants than in Assam. Then, how many elephants are there in Meghalaya?

(1) 8674 (2) 1754

(3) 1854 (4) 9684

**55.** While purchasing a refrigerator, Suhas gave a cheque of Rs. 64389/- to the shopkeeper. How will he write the amount, in words, on the cheque?

(1) Sixty four thousand three hundred and seventy nine.

(2) Sixty four thousand three hundred and ninety eight.

(3) Sixty four thousand three hundred and eighty nine.


(4) Sixty four thousand eight hundred and nine.

**56.** For travel, Shabnam thought of two options as Airways and Railways. The Air ticket fare was Rs. 13756/- and the Rail ticket fare was Rs. 2398/-. By how much is the Air ticket fare more than the Rail ticket fare?


(1) Rs. 11358/- (2) Rs. 16154/-

(3) Rs. 11442/- (4) Rs. 11468/-


**57.** In the figures given below, which option of shaded portion indicates a proper fraction?




(a)



(b)



(c)



(d)

(1) a (2) b

(3) c (4) d

**SPACE FOR ROUGH WORK**

**54.** आसाममध्ये ५७१९ हत्ती आहेत. आसामपेक्षा ३९६५ जास्त हत्ती मेघालयात आहेत. तर मेघालयात किती हत्ती आहेत?

(1) ८६७४ (2) १७५४

(3) १८५४ (4) ९६८४

**55.** सुहासने फ्रीज खरेदी करण्यासाठी दुकानदाराला ६४३८९ रूपयांचा धनादेश दिला. धनादेशावरील ही रक्कम तो अक्षरांत कशी लिहिल?

(1) चौसष्ट हजार तीनशे एकोणऐंशी

(2) चौसष्ट हजार तीनशे अठ्ठ्याण्णव

(3) चौसष्ट हजार तीनशे एकोणनव्वद


(4) चौसष्ट हजार आठशे नऊ

**56.** शबनमने प्रवासासाठी विमान व रेल्वे अशा दोन पर्यायांचा विचार केला. विमानाचे तिकिट १३७५६ रूपये होते तर रेल्वेचे तिकिट २३९८ रूपये होते. तर विमानाचे तिकिट रेल्वेच्या तिकिटापेक्षा कितीने जास्त होते?


(1) ११३५८ (2) १६१५४

(3) ११४४२ (4) ११४६८


**57.** खालील आकृत्यांमधील कोणत्या आकृतीतील रंगविलेला भाग छेदाधिक अपूर्णांक दर्शवितो?




(अ)



(ब)



(क)



(ड)

(1) अ (2) ब


(3) क (4) ड

**कच्च्या कामासाठी फक्त**

**58.** Shivam needs 15 minutes to water the backyard of the school. To water the same backyard, Seema needs a quarter of an hour, Sonali needs 900 seconds and Rahul takes half an hour. Then, who needs the longest time to water the backyard?


(1) Shivam (2) Rahul
(3) Sonali (4) Seema

**59.** What is the number of diameter and radii respectively in the given circle?



(1) 6, 2 (2) 6, 3
(3) 3, 6 (4) 2, 6


**60.** In the figure given below, in which of the clock, the hands are not forming an obtuse angle?



(a) (b) (c) (d)

(1) a (2) c
(3) d (4) b

**61.** Which 3 dimensional figure is formed when the paper is folded at the given lines.



(a) (b) (c) (d)


(1) d (2) a
(3) b (4) c

**SPACE FOR ROUGH WORK**

**58.** शाळेतील परसबागेला पाणी घालण्यासाठी शिवमला १५ मिनिटे, सीमाला पाव तास, सोनालीला ९०० सेकंद व राहुलला अर्धा तास लागतो. तर पाणी घालण्यासाठी सर्वात जास्त वेळ कोणाला लागतो?


(1) शिवम (2) राहुल
(3) सोनाली (4) सीमा

**59.** दिलेल्या वर्तुळात व्यास व त्रिज्या यांची संख्या अनुक्रमे किती?



(1) ६, २ (2) ६, ३
(3) ३, ६ (4) २, ६


**60.** खालीलपैकी कोणत्या घड्याळाच्या दोन काटयांमध्ये विशालकोन झालेला नाही?



(अ) (ब) (क) (ड)

(1) अ (2) क
(3) ड (4) ब

**61.** खालील आकृतीमध्ये दिलेल्या रेषांवर घड्या घालून कोणती त्रिमितीय आकृती तयार होते?



(अ) (ब) (क) (ड)

(1) ड (2) अ
(3) ब (4) क

**कच्च्या कामासाठी फक्त**

62. The arrival time of Chennama Express at the station was 8.00 p.m. on Monday. If the train arrived 5 hours late, then at what time did the train arrive?

(1) Monday 1.00 a.m.

(2) Monday 1.00 p.m.

(3) Tuesday 1.00 p.m.

(4) Tuesday 1.00 a.m.

63. Megha has equal number of notes of denomination of Rs. 50, Rs. 100, Rs. 200 and Rs. 500. The total amount is Rs. 3400/-. Then, how many notes does she have?

(1) 16 (2) 4

(3) 8 (4) 12

64. Saniya has 1 Ream of papers. She has to file 1 quire papers in each file. How many files will she require to file all the papers?

(1) 40 (2) 24

(3) 20 (4) 480

65. One cuboid is cut and 2 cubes of equal size are formed. Which of the following statements is true with respect to the numbers of edges of cube and number of edges of cuboid?

(1) Number of edges of cubes is 12 less than the number of edges of cuboid.

(2) Number of edges of cubes is 12 more than the number of edges of cuboid.

(3) Number of edges of cubes is same as the number of edges of cuboid.

(4) Number of edges of cubes is half the number of edges of cuboid.

**SPACE FOR ROUGH WORK**

**62.** राणी चेन्नमा एक्सप्रेसची स्टेशनवर येण्याची वेळ सोमवारी मध्यान्होत्तर ८ वाजताची होती. ती गाडी ५ तास उशिरा आली असल्यास ती किती वाजता स्टेशनवर आली?

(1) सोमवारी मध्यान्हपूर्व १ वाजता

(2) सोमवारी मध्यान्होत्तर १ वाजता

(3) मंगळवारी मध्यान्होत्तर १ वाजता

(4) मंगळवारी मध्यान्हपूर्व १ वाजता

**63.** मेघाकडे ५०, १००, २०० व ५०० च्या नोटांची संख्या समान आहे व त्याची एकूण रक्कम ३४०० रूपये आहे. तर तिच्याकडे एकूण किती नोटा आहेत?

(1) १६ (2) ४

(3) ८ (4) १२

**64.** सानियाकडे १ रिम कागद आहेत. तिला प्रत्येक फाईलमध्ये १ दस्ता कागद ठेवायचे आहेत. तर सर्व कागद ठेवण्यासाठी तिला किती फाईल लागतील?

(1) ४० (2) २४

(3) २० (4) ४८०

**65.** एक इष्टिकाचिती कापून तिचे दोन समान मापाचे घन तयार केले. दोन्ही घनाच्या कडांची संख्या व इष्टिकाचितीच्या कडांच्या संख्येबाबत खालीलपैकी कोणते विधान सत्य आहे?

(1) घनांच्या कडांची संख्या इष्टिकाचितीच्या कडांपेक्षा १२ ने कमी आहे.


(2) घनांच्या कडांची संख्या इष्टिकाचितीच्या कडांपेक्षा १२ ने जास्त आहे.

(3) घनांच्या व इष्टिकाचितीच्या कडांची संख्या समान आहे.


(4) घनांच्या कडांची संख्या इष्टिकाचितीच्या कडांच्या निम्मी आहे.

**कच्च्या कामासाठी फक्त**


**66.** Which figure will replace '?' in the below given figure pattern?





(1)





(2)




(3)




(4)




**67.** If Teachers' Day in 2026 falls on Saturday then what day will be the Childrens' Day in the same year?

(1) Monday
(2) Sunday
(3) Friday
(4) Saturday

**68.** Which of the following options express the fraction $\frac{3}{4}$ in incorrect form?

(1) $3 \times \frac{1}{4}$


(2) $3 + \frac{1}{4}$


(3) $\frac{1}{4} + \frac{1}{4} + \frac{1}{4}$


(4) 3 times $\frac{1}{4}$


**SPACE FOR ROUGH WORK**


**66.** खालील आकृतिबंधात पुढे येणारे चित्र कोणते?




(1) 


(2) 


(3) 


(4) 


**67.** २०२६ ला शिक्षकदिन शनिवारी येत असल्यास त्याच वर्षाचा बालदिन कोणत्या वारी येईल?

(1) सोमवारी (2) रविवारी

(3) शुक्रवारी (4) शनिवारी

**68.** $\frac{३}{४}$ हा अपूर्णांक खालीलपैकी कोणत्या स्वरूपात लिहिला असता चुकीचा ठरेल?

(1) $३ \times \frac{१}{४}$


(2) $३ + \frac{१}{४}$

(3) $\frac{१}{४} + \frac{१}{४} + \frac{१}{४}$

(4) $\frac{१}{४}$ ची ३ पट

**कच्च्या कामासाठी फक्त**

**69.** Which of the following options does not indicate the fraction expressed in figure?



(1) One and half

(2) 2 and half

(3) Two full and half

(4) $2\frac{1}{2}$

**70.** Mother filled Amla sherbat in 4 bottles with $\frac{1}{2}$ litre in each bottle. A quarter litre sherbat is remaining. How many litres of sherbat did she make?


(1) 2 litres

(2) One and a half litre


(3) 2 and a quarter litre


(4) 3 litres


**71.** Which of the following options will appear in the picture pattern?




?

(1) 


(2) 

(3) 

(4) 

**SPACE FOR ROUGH WORK**

**69.** खाली दिलेल्या पर्यायांपैकी कोणता पर्याय खालील आकृतीतील अपूर्णांक दर्शवित नाही?



(1) दीड (2) अडीच


(3) दोन पूर्ण आणि अर्धा (4) $२\frac{१}{२}$

**70.** आईने अर्धा लीटर आवळा सरबत एका बाटलीत याप्रमाणे चार बाटल्या भरल्यानंतर पाव लीटर सरबत शिल्लक राहिले. तर आईने किती लीटर सरबत बनविले?


(1) दोन (2) दीड


(3) सव्वा दोन (4) तीन


**71.** खालील आकृतिबंधात पुढे येणारी चित्रे कोणती?




?

(1) 

(2) 

(3) 

(4) 

**कच्च्या कामासाठी फक्त**

**72.** Between 1 to 100, by how much is the biggest prime number greater than the smallest prime number?

(1) 96 (2) 97

(3) 98 (4) 95

**73.** Manoj plucked 5 kg. grapes from a grape wine yard. He filled 3 boxes each with half kg grapes, 2 boxes each with a quarter kg. grapes and some boxes with 1 kg. grapes. How many 1 kg. boxes did he fill?

(1) 1 (2) 3

(3) 2 (4) 5

**74.** Swara bought 2 books of Ganit Pravinya exam for Rs. 175/- each. She gave Rs. 500/- note to the shopkeeper. He returned some Rs. 50/- notes to her. How many Rs. 50/- notes did the shopkeeper return to Swara?

(1) 3 (2) 15

(3) 30 (4) 2

**75.** The number of edges of a cylinder is _______________ the number of vertices of the cylinder.

(1) less by 2 (2) less by 1

(3) More by 2 (4) More by 1

**SPACE FOR ROUGH WORK**

**72.** १ ते १०० संख्यामधील सर्वात मोठी मूळ संख्या ही सर्वात लहान मूळ संख्येपेक्षा कितीने मोठी आहे?

(1) ९६ (2) ९७

(3) ९८ (4) ९५

**73.** मनोजने बागेतून ५ किलो द्राक्षे काढली. त्याने अर्धा किलो द्राक्षांच्या ३ पेट्या, पाव किलो द्राक्षांच्या २ पेट्या व उरलेल्या द्राक्षांच्या एक किलोच्या काही पेट्या भरल्या तर त्याने एक किलो द्राक्षाच्या किती पेट्या भरल्या?

(1) १ (2) ३

(3) २ (4) ५

**74.** स्वराने गणित प्राविण्य परीक्षेची २ पुस्तके प्रत्येकी १७५ रूपयांना विकत घेतली. दुकानदाराला तिने ५०० रूपयांची नोट दिली. दुकानदाराने तिला ५० रूपयांच्या काही नोटा परत दिल्या. तर दुकानदाराने तिला ५० रूपयांच्या किती नोटा परत दिल्या?

(1) ३ (2) १५

(3) ३० (4) २

**75.** दंडगोलाच्या कडांची संख्या कोपऱ्यांच्या संख्येपेक्षा __________ असते.

(1) २ ने कमी (2) १ ने कमी

(3) २ ने जास्त (4) १ ने जास्त

**कच्च्या कामासाठी फक्त**

**कच्च्या कामासाठी फक्त**